Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 566 – 569
DOI: 10.5281/zenodo.10258827

Original Research Article

# महात्मा गांधींचे आर्थिक विचार

प्रा. नामदेव विठ्ठलराव बच्चेवार

संशोधक विद्यार्थी, श्री शाहू मंदिर महाविद्यालय पर्वती, पुणे ४११००९ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: namdev.vbacchewar@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## गोषवारा

हे संशोधन गांधीजींच्या आर्थिक विचारावर आधारित असून यामध्ये गांधीजींनी कशाप्रकारे देशाच्या अर्थकारणासाठी स्वदेशी, यांत्रिकीकरणाचा विरोध, खेड्याकडे चला यासारख्या धोरणावर भर दिला. गांधीजींचे विचार हे भारतीय अर्थव्यवस्थेला धरून होते. त्यांनी अनियंत्रित भांडवलशाहीतील नफेखोरी, संपत्तीसंचय, आर्थिक शोषण अशा सर्व अतिरेकी वैशिष्ट्यांना गांधीजींनी विरोध केला होता. परिणामी पाश्चिमात्य देशातील आर्थिक संकटांसारख्या धोक्यांपासून भारत दूर राहू शकतो. अशा वेगवेगळ्या घटकावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच देशाच्या आर्थिक विकासासाठी ज्या आर्थिक घटकांचा अभ्यास केला त्या घटकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## प्रस्तावना

महात्मा गांधी यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे होते. त्यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरातमधील पोरबंदर या ठिकाणी झाला. त्यांचे वडील राजकोट येथे दिवाण होते. त्यांची आई एक धार्मिक स्त्री होत्या. स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका घेऊन आणि देशाला स्वतंत्र करण्यात भाग घेतल्यामुळे त्यांना राष्ट्रपिता म्हणतात. त्यांनी अर्थशास्त्रावर बरेच लिखाण केले आहे. महात्मा गांधी यांनी अर्थशास्त्राच्या परिभाषेत अर्थशास्त्र सांगितले नाही. आर्थिक विकासापेक्षा उच्च सामाजिक आणि वैयक्तिक मूल्ये स्थापित करण्यावर त्यांनी अधिक भर दिला. मात्र त्यातून आर्थिक प्रश्नांची उत्तरे नक्की मिळतात. त्यांचे अर्थशास्त्र हे नैतिक आणि सामाजिक असून त्यांच्यातून सर्व भारतीयांना मोठा संदेश मिळतो. अर्थशास्त्राच्या परिभाषेत मांडले नसले तरी जीवन व्यवहाराशी संबंधित असे विचार महात्मा गांधींनी मांडले आहेत.

## संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये

१. गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.
२. यांत्रिकीकरणाविषयी गांधीजींचे विचार अभ्यासणे.

३. खेड्याविषयी गांधीजींचे विचार अभ्यासणे.
४. स्वदेशी विषयी गांधींचे मत अभ्यासणे.

**संशोधन विषयाची गृहीतके**

१. गांधीजींनी स्वदेशीचा पुरस्कार केला.
२. गांधीजींनी यांत्रिकीकरणाला विरोध विरोध केला.
३. गांधीजींनी साध्या राहणीमानाचा पुरस्कार
४. गांधीजींनी नियंत्रित उद्योगांना पाठिंबा दिला.

**संशोधन विषयाचे स्पष्टीकरण**

गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करत असताना आपल्याला गांधी समजून घ्यावे लागतील. गांधींनी देशाच्या अर्थव्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी स्वदेशीचा पुरस्कार केला. देशातील बेकारी कमी होण्यासाठी किंवा वाढ न होण्यासाठी त्यांनी यांत्रिकीकरणाचा विरोध केला. त्यांच्या मते यांत्रिकीकरणामुळे श्रमाची मागणी कमी होऊन रोजगार कमी होऊ शकतो, जे कि भारतासारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या देशाला परवडणारे नाही.भारताला खेड्यांचा देश म्हणून ओळखले जाते आणि भारताला विकसित व्हायचे असेल तर खेड्यांचा विकास झाला पाहिजे.म्हणून त्यांनी 'खेड्यांकडे चला' हा नारा दिला.

**खेड्याकडे चला**

महात्मा गांधींनी त्यावेळी ‘खेड्यांकडे चला’ असा मोठा संदेश दिला होता. आजच्याप्रमाणेच त्यावेळी देखील ग्रामीण अर्थव्यवस्था महत्त्वाची होती. मात्र आज देखील देशातील प्रत्येक शहरात वाढत जाणारा रोजगाराचा प्रश्न, वाढती गर्दी, गुन्हेगारी यामुळे गांधीजींचा ‘खेड्यांकडे चला’ संदेश आजही या आर्थिक समस्येचे निराकरण करण्याचा मार्ग सुचवतो. देशातील बहुसंख्य जनता प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. देशाची आर्थिक प्रगती कृषी ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. कृषी ग्रामीण क्षेत्रातील उत्पादकता, गुंतवणूक, रोजगारनिर्मितीचे महत्त्व या संदेशातून गांधीजींनी अधोरेखित केले होते. त्यांच्या कल्पनेप्रमाणे जर प्रत्येक गाव स्वयंपूर्ण झाले तर भारताला फार मोठा आर्थिक विकास साधणे शक्य होईल. ग्रामीण विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याचे महत्त्व गांधींनी स्वातंत्र्यापूर्वीच सांगितले होते.

**स्वदेशीचा नारा**

स्वदेशीचा फार व्यापक आणि देशाच्या प्रगतीसाठी समर्पक अर्थ गांधीजींनी आपल्यासमोर ठेवला. सध्या जगभरात मंदीचे वातावरण आहे. त्यामुळे बऱ्याच देशांची अर्थव्यवस्था मोडकळीस आली आहे. त्यावर देखील गांधीजींनी "स्वदेशी म्हणजे देशाची स्वयंपूर्णता" असा मंत्र दिला आहे. जागतिक मंदीचा सामना करण्यासाठी देशांतर्गत उत्पादन व मागणीला महत्त्व देणे गरजेचे आहे. परदेशी वस्तूंचा वापर केल्याने आपले चलन परदेशात खर्च करावे लागते. सध्याच्या काळात वाढत्या कच्च्या तेलाच्या किमती यामुळे देशाची आयात, व्यापार तूट, परदेशी चलनांच्या तुलनेत रुपयाचे घटते मूल्य सर्व समस्यांच्या मुळाशी गांधीजींच्या कल्पनेतील स्वदेशी मूल्याचे महत्त्व समजून येते.

गांधीजींचे विचार हे भारतीय अर्थव्यवस्थेला धरून होते. त्यांनी अनियंत्रित भांडवलशाहीतील नफेखोरी, संपत्तीसंचय, आर्थिक शोषण अशा सर्व अतिरेकी वैशिष्ट्यांना गांधीजींनी विरोध केला होता. परिणामी पाश्चिमात्य

देशातील आर्थिक संकटांसारख्या धोक्यांपासून भारत दूर राहू शकतो. याचबरोबर सत्य आणि अहिंसा या मूल्यांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. आजच्या डिजिटल युगात फक्त आपल्याला गांधीजींच्या विचारांचे नवे संदर्भ शोधण्याची गरज आहे. त्यासाठी गांधीजींप्रमाणे सत्य आणि अहिंसेचा मार्ग प्रामाणिकपणे अंगिकारला जाणे गरजेचे आहे.

**यांत्रिकीकरणाचा विरोध**

यंत्र हे मानवी श्रमाला विरोध करते. यंत्रामुळे बेकारी आणि दारिद्रयाचे प्रमाण वाढते तसेच ते मानवी श्रमाचे उच्चाटन करून मोजक्या लोकांच्या हाती सत्ता केंद्रीकरण करते. म्हणून महात्मा गांधीजींनी यांत्रिकीकरणाचा विरोध केला. मानवाला साहाय्यकारी असणाऱ्या व त्याला होणारा त्रास कमी करणाऱ्या यंत्राला त्यांचा पाठिंबा होता.परंतु मानवी श्रमाची मागणी कमी करणाऱ्या यांत्रिकीकरणाला त्यानी नाकारल. गांधींचा यंत्रसामग्रीला पूर्ण विरोध नव्हता; त्याने त्याचे स्वागत केले जेथे ते कष्ट टाळते आणि त्रास कमी करते. इष्ट तंत्रज्ञानाचे उदाहरण म्हणून ते सिंगर शिलाई मशीनचे उदाहरण देत असत. त्यांनी श्रमाच्या प्रतिष्ठेवरही जोर दिला आणि शारीरिक श्रमाबद्दल समाजाच्या तिरस्काराच्या वृत्तीवर टीका केली. प्रत्येकाने काहीतरी 'ब्रेड लेबर' करावे असा त्यांचा आग्रह होता.

**साधे राहणीमान**

गांधींच्या आर्थिक विचारांचे पहिले मूलभूत तत्त्व म्हणजे 'साधा राहणीमान' होय. जे तुमच्या इच्छा कमी करण्यास आणि स्वावलंबी होण्यास मदत करते. स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग ' आणि ' स्टँडर्ड ऑफ लाइफ ' यांमध्ये फरक करणे आवश्यक आहे, जेथे पूर्वी फक्त अन्न, वस्त्र आणि घराचे भौतिक आणि भौतिक दर्जा सांगते. याउलट, भौतिक प्रगतीबरोबरच सांस्कृतिक आणि आध्यात्मिक मूल्ये आणि गुण आत्मसात करण्याचा गंभीर प्रयत्न केला तरच जीवनाचा उच्च दर्जा प्राप्त होऊ शकतो. साधेपणात जे साध्य करता येते त देखाव्यात किंवा उच्च राहणीमानात करता येत नाही असे गांधीजींचे मत होते.

**गांधीजींचा विकेंद्रित अर्थव्यवस्थेवर भर**

स्वातंत्र्य चळवळीचे अग्रणी नेते या नात्याने राष्ट्राच्या आर्थिक हितसंबंधांची जपणूक करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यातूनच त्यांच्या विचारांना राष्ट्रवादाची जोड देता आली. स्पर्धेवर आधारलेली अर्थव्यवस्था माणसाला स्वयंकेंद्रित व स्वार्थी बनविते, असे त्यांचे मत बनले होते. तिला पर्याय म्हणून लहान-लहान गटांची स्वायत्तता व त्यातील सर्व व्यक्तींचे स्वयंस्फूर्त सहकार्य (स्वयंसेवक) या तत्त्वावर चालणाऱ्या छोट्या वसाहतीचे त्यांनी प्रयोगही केले. भारतातील राजकारणात पदार्पण केल्यानंतर येथील खेड्यांशी गांधीजींचा जवळून संबंध आला. शेतीला केंद्रस्थानी असणारी भारतीय समाज आणि अर्थव्यवस्था हीच या देशाची ताकद आहे, हे गांधींनी मनोमन जाणले आणि म्हणूनच खेड्यांतीत स्वयंपूर्ण ग्रामसंस्था नव्या विकेंद्रित अर्थव्यवस्थेला पायाभूत बनू शकेल, अशी आशा त्यांनी मनाशी बाळगली आणि त्यादृष्टीने आपल्या विधायक कार्यक्रमाची त्यांनी आखणी केली. पुढे यालाच आधारभूत ‘खेड्याकडे चला’ हे गांधीजींच्या नावाने बोलले जाणारे शाश्वत मूल्यच जणू होऊन गेले. असे म्हणतात की, गांधीजींचा यंत्र संस्कृतीला विरोध होता. आजच्या रोबोटिक झालेल्या मानवाकडे व स्वत:कडे बघितले की, गांधीजींची त्यामागची भूमिका खूप व्यापक वाटायला लागते. माणसातले माणूसपण जपणारे, निसर्गाशी जवळीक साधून राहण्यासाठीचे त्यांचे मार्गदर्शक विचारांचे मूल्य खूप महान वाटायला लागते.

### स्वराष्ट्र नियंत्रित उद्योगांना गांधीजींचा पाठिंबा

महात्मा गांधींना स्वदेशीचे कट्टर पुरस्कर्ते मानले जाते. औद्योगिकीकरणाला गांधीजींचा विरोध होता, अशीही मांडणी काहीजण करीत असतात. स्वदेशी संदर्भातील गांधीजींच्या विचारांना आजही आपण आव्हान देऊ शकत नाही, गांधीजींची स्वदेशी कंपनीची कल्पना किती स्पष्ट होती, याची प्रचिती पुढील वक्तव्यावरून येते. ते म्हणतात, “ज्यांचे नियंत्रण, दिग्दर्शन आणि व्यवस्थापन हे मॅनेजिंग डायरेक्टर अथवा मॅनेजिंग एजंट्स यांच्याद्वारे भारतीयांच्या हातात असेल, त्या भारतीय कंपन्या होत. भांडवलाची आणि तांत्रिक ज्ञानाची जेव्हा आपणास गरज असेल आणि आपल्या देशात ती उपलब्ध नसतील तेव्हा परकीय भांडवल आणि तंत्रज्ञ यांचा वापर करण्यास माझी हरकत नाही.मात्र, हे भांडवल भारतीय नियंत्रणाखाली असावे आणि भारताच्या हितासाठी त्याचा विनियोग करण्यात यावा. परंतु, परकीय भांडवलाचा किंवा तंत्रज्ञांचा वापर करणे आणि परकीय कंपन्या भारतात वाढू देणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. या कंपन्या (उद्योग) स्वदेशी म्हणता येणार नाहीत.” कोणत्याही उद्योगाचा उद्देश हा केवळ उत्पादनाचा न ठेवता बेकारी निवारण्याचा प्राधान्याने असावा, असे मत मांडताना देशी उद्योगधंद्यांमध्ये यंत्रोद्योग व ग्रामोद्योग या दोन्हींचा समावेश असावा. त्यातही ग्रामोद्योगांत प्राधान्य असावे, असा विचार ते आग्रहाने मांडतात. याच विचारातून गांधीजींनी ‘अखिल भारतीय चरखा संघ’, ‘ग्रामोद्योग संघ’ या संस्थांची स्थापना केली.

### संदर्भ सूची

१. आर्थिक विचारांचा इतिहास -प्रा डॉ जे एस पाटील फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. गांधीवादी अर्थशास्त्र: एक मानवी दृष्टीकोन शर्मा, रश्मी (1997) दीप आणि दीप पब्लिकेशन्स

३. गांधीवादी अर्थशास्त्राची प्रासंगिकता नारायण, श्रीमन (1970) नवजीवन पब्लिशिंग हाऊस.

४. “गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य”. डॉ. द. दि. पुंडे, प्रतिमा प्रकाशन, १९९५

५. “लोकमान्य ते महात्मा”, सदानंद मोरे राजहंस प्रकाशन, २००७

६. ‘हिंदी साहित्य में गांधीवाद’ चंद्रकांत बांदिवडेकर